04 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तर्कतीर्थांच्या साहित्यावर बहुविद्याशाखीय परिषद घेणार

## कुलगुरू; डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्याकडून खंडांचा पहिला संच विद्यापीठास सुपुर्द

**सकाळ वृत्तसेवा**



**कोल्हापूर : ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी संपादित केलेल्या 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्र जोशी समग्र वाङ्मया'चा पहिला संच गुरुवारी शिवाजी विद्यापीठाकडे सुपुर्द केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांना डॉ. रणधीर शिंदे आणि नंदकुमार मोरे यांनी संच दिला. शेजारी धनंजय सुतार, प्रकाश पवार, विश्वास पाटील, अशोक चौसाळकर, डॉ. लवटे, श्रीकृष्ण महाजन आदी.**

कोल्हापूर, ता. ३ : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र साहित्याचे अतिव्यापक संकलन आणि संपादन करून डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी सागरासारखे विशाल कार्य साकारले आहे. या साहित्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठात बहुविद्याशाखीय ज्ञान परिषद घेण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज जाहीर केले.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लवटे यांनी विक्रमी वेळेमध्ये मराठी विश्वकोशाचे पहिले अध्यक्ष तथा प्राच्यविद्यापंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र साहित्याचे संकलन करून 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मया'चे १८ खंड संपादित केले आहेत. या खंडांचा पहिला संच आज डॉ. लवटे यांनी विद्यापीठास सुपुर्द केला. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी तो स्वीकारला. त्यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते.

डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. रणधीर शिंदे यांनी डॉ. लवटे यांनी साकारलेल्या या महाप्रकल्पाचे महत्त्व सांगितले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी समग्र वाङ्मय खंडांचा पहिला संच कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्याकडे सुपुर्द केले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शाल, श्रीफळ आणि ग्रंथभेट देऊन डॉ. लवटे यांचा विद्यापीठातर्फे सत्कार केला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. विश्वास पाटील उपस्थित होते.

04 OCT 2024
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. डी. टी. शिर्के : सुनीलकुमार लवटे यांच्यातर्फे खंड भेट

# तर्कतीर्थांच्या साहित्याच्या अनुषंगाने विद्यापीठात परिषद



डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मया'चा पहिला संच शिवाजी विद्यापीठास प्रदान केला. यावेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रमोद पाटील, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र साहित्याचे अतिव्यापक संकलन व संपादन करून डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी सागरासारखे विशाल कार्य साकारले आहे. या साहित्याच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठात बहुविद्याशाखीय ज्ञान परिषद आयोजित करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी जाहीर केले.

ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी अत्यंत विक्रमी वेळेमध्ये मराठी विश्वकोशाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समग्र साहित्याचे संकलन करून 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मया'चे १८ खंड संपादित केले आहेत. त्यांचे गेल्या आठवड्यात मुंबईत प्रकाशन केले. या १८ खंडांचा पहिला संच डॉ. लवटे यांनी आज विद्यापीठास सुपूर्द केला. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी तो स्वीकारला.

डॉ. शिर्के म्हणाले, डॉ. लवटे यांनी साकारलेल्या या कार्याच्या अनुषंगाने तर्कतीर्थांच्या वाङ्मयाचा साकल्याने वेध घेणारी परिषद विद्यापीठात आयोजित करण्यात येईल. या परिषदेस राज्यभरातील तज्ज्ञ अभ्यासक व संशोधकांना आमंत्रित करण्यात येईल. यावेळी डॉ. अशोक चौसाळकर यांनी डॉ. लवटे यांनी साकारलेले कार्य असाधारण स्वरूपाचे असून, महाराष्ट्राच्या भावी पिढ्या त्यांच्याप्रती कृतज्ञ राहतील, असे गौरवोद्गार काढले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. /

# मराठी भाषा आता ज्ञानभाषा होण्यासाठी प्रयत्न व्हावेत

## साहित्यिक, प्राध्यापक, मराठी भाषा अभ्यासकांची भावना

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र सरकारने मराठी भाषेसह आणखी पाच भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. हा महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक दिवस आहे. मराठी भाषेची उपक्रमशीलता वाढविणे आणि ज्ञानभाषा बनविण्याची सर्वांवर जबाबदारी वाढली आहे, अशी भावना मराठी भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक, मराठी भाषा अभ्यासकांनी व्यक्त केल्या आहेत.

केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षांपासून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर मराठीतील साहित्यिक, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मान्यवरांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषा उपक्रमशील होईल. या उपक्रमशीलतेला सरकारी पाठबळ मिळणार आहे. मराठी भाषेचा प्रसार संपूर्ण भारतभर होण्यास व मराठी साहित्यास मोठा सन्मान मिळणार आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठीच्या चळवळीला पहिला वेग आम्ही अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पाच लाख पोस्टकार्डस् पंतप्रधाना पाठवण्याची जी मोहीम हाती घेतली व पंचवीस हजार पोस्टकार्ड एकाच दिवशी आम्ही सातारा येथून पोस्ट केली तेव्हापासून आलेला होता. पुढे सर्व पातळ्यांवर सातत्याने केंद्राकडे आम्ही पाठपुरावा करत राहिलो. सर्व विरोधी पक्षांनी संसदेत विषय लावून धरला. माध्यमांनी उत्तम साथ दिली. केंद्र सरकारचे त्यासाठी विशेष अभिनंदन आणि आभार.

**- श्रीपाद भालचंद्र जोशी**, प्रमुख संयोजक, मराठीच्या व्यापक हितासाठी

आता मराठी ज्ञानभाषा करण्यासाठी विज्ञान, कायदा, शास्त्र यासह जगातील उत्तम ज्ञान मराठीत आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. मराठी भाषा अधिक समृद्ध कशी होईल व मराठी शाळा वाचविण्याची सरकारसह अभ्यासक, संशोधकांवरील जबाबदारी वाढली आहे.

**- डॉ. राजन गवस**, ज्येष्ठ साहित्यिक

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने उपक्रमशील राहण्यासाठी पुरेसे पाठबळ मिळेल. भाषा उपक्रमशील झाल्यावर तिचा विकास अधिक गतीने होईल. केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे.

**- डॉ. नंदकुमार मोरे**, अधिविभागप्रमुख मराठी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ

मराठी भाषा केवळ महाराष्ट्रापुरती बोलली जात नसून देशाच्या विविध प्रांतात तिचे चांगले स्थान आहे. अभिजात दर्जा मिळाल्याने विविध प्रांतातील मराठी भाषा बोलणाऱ्यांशी जोडले जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**- कृष्णात खोत**, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते

मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास व तिच्यातील समृद्ध भाषा साहित्य परंपराबद्दलचा हा महत्त्वपूर्ण निर्णय आहे. एकंदरीतच मराठी भाषा संवर्धन, संशोधन व समृद्धीसाठी याचा उपयोग होईल.

**- डॉ. रणधीर शिंदे**, ज्येष्ठ मराठी समीक्षक

जागतिक स्तरावर मराठी भाषा बोलणारे असंख्य लोक आहेत. त्या सर्व मराठी भाषिकांचा हा विजय आहे. फुले-शाहू-आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांची मातृभाषा मराठी आहे. मराठी भाषेचा सोनेरी इतिहास जागतिक पातळीवर नोंद झाला.

**-डॉ. शरद गायकवाड**, मराठी भाषा अभ्यासक

खरे तर मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देऊन चालणार नाही तर ती रोजगाराचीही भाषा झाली पाहिजे. आताच्या राज्य सरकारने मराठी भाषेच्या विकासासाठी ठोस पावले उचलावीत अशी अपेक्षा आहे.

**- जीवन साळोखे**, ज्येष्ठ साहित्यिक

मराठी भाषिक लोक या निर्णयामुळे मराठी भाषेचा दैनंदिन जीवनात अधिक प्रभावी वापर करतील, असा आशावाद आहे. मराठी भाषा व्यवहारात आणण्यासाठी याचा उपयोग होईल.

**- अरुण नाईक**, ग्रंथ अभ्यासक

देशाच्या ७५ वर्षांच्या इतिहासात एकूण सहा प्रादेशिक भाषांना अभिजात दर्जा मिळाला आहे. अभिजात दर्जा मिळाल्याने मराठीचा सर्वांगीण विकास होईल. वाचन संस्कृती वृद्धिंगत करणाऱ्या ग्रंथालयांना बळ मिळेल.

**- कृष्णा दिवटे**, समन्वयक, पुस्तकप्रेमी समूह

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने सृजनशील लेखन करणाऱ्या लेखकांपासून ते अभिजात भाषेसाठी ज्यांनी ज्यांनी लेखन केले आहे, त्या सर्वांच्या दृष्टीने हा आनंदाचा अभिमानाचा क्षण आहे.

**- पाटलोबा पाटील**, ज्येष्ठ लेखक

04 OCT 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आता मराठीचा होईल जगभर सन्मान




## अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आनंद व्यक्त : प्रदीर्घ काळाची मागणी पूर्ण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३ : केंद्र सरकारने आज मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आणि प्रदीर्घ काळाची महाराष्ट्राची मागणी पूर्ण झाली. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने जगभरातील लोक मराठीकडे वळतील आणि त्यातून ही भाषा आणखी सर्वदूर पोहोचेल, असा विश्वास आज या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केला.

“ मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्याची घटना अतिशय आनंददायी आहे. मराठी भाषेतील विविध उपक्रम राबविण्यासाठी आणि मराठी साहित्य देशभर पोहोचविण्यासाठी सरकारी पाठबळ मिळणार आहे. त्यामुळे मराठी भाषेचा, साहित्यिकांचा देशभर सन्मान होईल.

**- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

“ भारत सरकारने मराठी भाषेला उशिरा का होईना अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल सरकारचे अभिनंदन. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यामुळे मराठी भाषेची भविष्यकाळात संस्कृत, तमिळ, मल्याळम आदी भारतातील श्रेष्ठ भाषांच्या पंक्तीत गणना होईल. भारतातील भाषेच्या इतिहासात मराठी भाषा अग्रस्थानी विराजमान होईल.

**प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे,** प्रसिद्ध हिंदी साहित्यिक

“ मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर ती अधिक उपक्रमशील होण्यासाठी योग्य असे पाठबळ मिळणार आहे. मराठी भाषेच्या वाढीसाठी आवश्यक असे उपक्रम सुरू होतील. त्यातून मराठी भाषा विकासाला चालना मिळेल.

**- डॉ. नंदकुमार मोरे,** मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

“ केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे मराठी भाषेचे प्राचीनत्व, महत्त्व, स्वतंत्रता अधोरेखित झाली आहे. मराठी भाषेचा विकास आणि संवर्धनासाठी हा निर्णय उपयुक्त ठरणार आहे. भाषा, संस्कृती, साहित्याविषयी व्यक्तिगत, संस्थात्मक पातळीवर काम अधिक चांगल्या पद्धतीने होईल.

**- डॉ. रणधीर शिंदे,** प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

“ ज्या मराठी भाषेत आपण पहिला शब्द बोलतो, त्या भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. इतर भाषांतील विविध साहित्य अनुवादित करून मराठीत आणताना आता आणखी अभिमान वाटणार आहे. कारण मराठीचे अभिजातपण सिद्ध झाले आहे आणि आम्हा सर्वांसाठी ही नक्कीच आनंददायी बाब आहे.

**- सोनाली नवांगुळ,** साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 OCT 2024
तरुण भारत

# मराठी भाषेच्या विकासाला चालना मिळेल

कोणतीही भाषा विकसित होण्यासाठी ती उपक्रमशील राहावी लागते. मराठीला अशा पद्धतीने उपक्रमशील राहण्यासाठी सरकारी पाठबळ मिळाले आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या विकासाला चालना मिळेल. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून देण्यासाठी परिश्रम घेतलेल्या सर्वांचे अभिनंदन.

– डॉ. नंदकुमार मोरे (मराठी अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ)

04 OCT 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा गांधी नेते नव्हे विचार : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महात्मा गांधी हे फक्त स्वातंत्र्यलढ्यापुरते समजून घ्यायचे व्यक्तिमत्त्व नाही. ते फक्त राजकीय नेते नव्हते तर गांधी हा एक विचार होता, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी केले.

येथील महावीर महाविद्यालयात महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या 'गांधी समजून घेताना' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.




महावीर कॉलेजमध्ये महात्मा गांधी जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात डॉ. अवनीश पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे व मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. पाटील म्हणाले, सत्याचे प्रयोग हेच गांधीजींच्या जीवनाचे रहस्य होते. हे पुस्तक सर्व विद्यार्थ्यांनी वाचावे.

डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी प्रास्ताविक केले. उमेश वांगदरे यांनी परिचय करून दिला. प्रकाश कांबळे व प्रकाश चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. तर अंकुश गोंडगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 OCT 2024
लोकमत

# मूल्याधारित शिक्षणासाठी महात्मा गांधी आग्रही

## डॉ. विश्वास पाटील : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : शिक्षण हा मानवी जगण्याचा, झुंजण्याचा आणि समर्पणाचा विषय आहे. शिक्षणाने माणूस खऱ्या अर्थाने मूल्यसमृद्ध बनतो. मूल्याधारित शिक्षणासाठी महात्मा गांधी आग्रही राहिले. त्यांच्या या शिक्षणाच्या संकल्पनेतूनच उद्याचा उज्ज्वल भारत उभा राहील, असे प्रतिपादन गांधीवादी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्राचार्य डॉ. विश्वास पाटील यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि राज्यशास्त्र अधिविभाग यांच्यावतीने डॉ. उषा मेहता स्मृती व्याख्यानमालेंतर्गत 'महात्मा गांधी यांची शिक्षण पद्धती' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाला ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे उपस्थित होते.

राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय करून दिला. अक्षय जहागीरदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

### शिक्षण म्हणजे आत्मभान, आत्मसन्मान

- डॉ. विश्वास पाटील म्हणाले, शिक्षण म्हणजे आत्मभान आणि आत्मसन्मान असे गांधीजी मानत असत. त्यांचे जीवन सतत शिकण्याचे आणि जगाला शिकवण्याचे मूर्तिमंत प्रतीक होते.
- शिक्षण हे प्रयोगशील असावे. ते केवळ शब्दप्रधान नव्हे, तर अर्थप्रधान असावे, अशी गांधीजींची धारणा होती. त्यांचे शिक्षण हे संघर्ष आणि रचना यावर आधारित होते. त्यांच्या ज्ञानाने व्यवस्थेच्या मुळावर घाव घातला.